मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# विजय शिवतारे खरोखरच बंडखोरी करणार का?

## शिवसेनेने जागा वाटपाचे सर्व अधिकार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना : उदय सामंत



**। पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** बारामतीमध्ये पवार कुटुबियांबरोबरच महायुतीमध्ये मोठे राजकीय घमासान सुरु असून माजी राज्यमंत्री, पुरंदरचे माजी आमदार विजय शिवतारे यांनी बंडखोरी करुन निवडणूक लढविण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे शिवतारे खरोखरच बंडखोरी करणार का याबाबत राज्यातील जनतेला उत्सुकता लागली आहे. चिंचवड दौऱ्यावर असेलेले शिवसेनेचे नेते, राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांना याबाबत विचारले असता ते म्हणाले, की, बारामतीत बंडखोरीच्या तयारीत असलेल्या विजय शिवतारे यांची भूमिका मला झेपणारी नाही. पेलवणारी नाही. त्यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत आज बैठक आहे. त्यात मार्ग निघेल. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत नेमका काय मार्ग निघतो, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.शिवसेनेने जागा वाटपाचे सर्व अधिकार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहेत. त्यांच्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे. ते जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य राहील असे सांगतानाच खासदार बारणे यांचा सहकारी म्हणून माझे मन सांगतेय की मावळमधून बारणे हेच दीड महिन्यांनी खासदार म्हणून लोकसभेत दिसतील असा दावा केला. सामंत यांच्या या विधानामुळे मावळची जागा शिवसेनेकडेच कायम राहण्याची आणि बारणे यांना तिस-यांदा उमेदवारी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तीर्थक्षेत्र देहू, आळंदीतून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी नद्या स्वच्छ करण्याची वारकऱ्यांची मागणी कोणत्याही परिस्थितीत पूर्ण केली जाणार आहे. त्यासाठी दोन हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. नदी स्वच्छतेचा विकास आराखडा (डीपीआर) तयार करण्याच्या सूचना केल्या आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन नोव्हेंबरमध्ये प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल, असेही सामंत म्हणाले.

# निवडणुकीच्या तोंडावर घोषणा म्हणणाऱ्यांना चपराक..!

## पिंपरी-चिंचवडकर भूमिपुत्रांना 'जीआर' समर्पित : आमदार लांडगे



**। पिंपरी-चिंचवड।** पिंपरी-चिंचवडमधील भूमिपुत्रांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न प्राधिकरण बाधितांचा साडेबारा टक्के परतावा प्रश्न ५० वर्षांच्या प्रतिक्षेनंतर मार्गी लागला. मात्र, आगामी निवडणुकीच्या तोंडावर ही केवळ घोषणाबाजी आहे. प्रत्यक्षात 'जीआर' नाही, असा दावा केला जात होता. मात्र, कॅबिनेट बैठकीत निर्णय झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसांत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी 'जीआर' काढून दाखवला. त्यामुळे भूमिपुत्रांमध्ये आनंदोत्सव साजरा केला जात आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, विकास प्राधिकरणामार्फत जमीन मालकाना परत करावयाची ६.२५ टक्के विकसित जमीन शक्य असल्यास ज्या गावातील जमीन संपादित केली असेल तेथे देण्यात येईल. त्या गावात तेवढी जमीन उपलब्ध नसेल तर दुसऱ्या गावात उपलब्धतेनुसार वितरित करण्यात येणार आहे. याबाबतच्या प्रस्तावाला कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. दरम्यान, पिंपरी-चिंचवडसह राज्य पातळीवर प्राधिकरण परतावा निर्णयाचे श्रेय घेण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांमध्ये चढाओढ सुरू झाली होती. तसेच, विरोधी पक्षातील स्थानिक राजकीय व्यक्तींनी ही केवळ निवडणुकीच्या तोंडावर केलेली घोषणा आहे, असा दावा जाहीरपणे केला होता.

सन १९७२ ते १९८३ या कालावधित संपादित क्षेत्राच्या जमिनीचा मोबदला ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वीच घेतला आहे, त्यांना या निर्णयानुसार ६.२५ टक्के प्रमाणे जमीन परतावा करण्यापूर्वी त्यांनी तेवढ्या प्रमाणात जमीन मोबदला रक्कम सव्याज (व्याजाची रक्कम जिल्हाधिकारी कार्यालय ठरवेल त्याप्रमाणे, ज्या तारखेपासून मोबदला घेतला असेल त्या तारखेपासून अशा ६.२५ टक्के जमिनीचा ताबा घेण्याच्या तारखेच्या मुदतीपर्यंत) प्राधिकरणाला परत करावी लागणार आहे.पिंपरी-चिंचवडमधील प्राधिकरण बाधित भूमिपुत्रांनी गेल्या ५० वर्षांपासून केलेल्या प्रतीक्षेचे आज फलित झाले. राज्यातील महायुती सरकारने पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण बाधित शेतकऱ्यांना साडेबारा टक्के म्हणजे ६.२५ टक्के जमीन परतावा आणि २ टक्के चटईक्षेत्र निर्देशांक (एफएसआय) विनामूल्य मंजूर करण्याची मोठी घोषणा कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत केली होती. त्यानंतर ही निवडणुकीच्या तोंडावर घोषणा असल्याचा दावा केला जात होता. मात्र, अवघ्या दोन दिवसांत अध्यादेश (जीआर) काढण्यात आला. त्यामुळे माझे भूमिपुत्र शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबियांनी वर्षानुवर्षे लावलेली आस पूर्ण झाली. पिंपरी-चिंचवडकर भूमिपुत्रांना हा 'जीआर' आम्ही समर्पित करतो, अशा भावना आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.

# मावळ लोकसभेवर झेंडा फडकणार : अहिर

## सर्वच पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा संजोग वाघेरेंना विजयी करण्याचा निश्चय




**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
लोकशाही संपविण्याचा प्रयत्न हुकूमशाही माध्यमातून सुरू आहे. देशाच्या हितासाठी, तसेच गद्दारी करणा-यांना धडा शिकविण्यासाठी सर्व मिळून आपली ताकद पणाला लावू आणि आगामी निवडणुकीत मावळ लोकसभेवर इंडिया आघाडीचा झेंडा फडकवू, असे आवाहन शिवसेना सचिन अहिर यांनी केले. त्यांच्यासह रायगड जिल्ह्यातील आघाडीतील सर्वच पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा संजोग वाघेरेंना विजयी करण्याचा निश्चय यावेळी केला.मावळ लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी व इंडिया आघाडीतील सर्व राजकीय पक्ष आणि संघटना यांचे शहराध्यक्ष, प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची समन्वय बैठक बुधवारी (दि.१४) कर्जत येथील चौक नाका येथे पार पडली. या बैठकीत मार्गदर्शन करताना सचिन अहिर बोलत होते. या प्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळासाहेब पाटील, शिवसेना उरणचे माजी आमदार मनोहर भोईर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे रायगड जिल्ह्याचे प्रभारी प्रशांत पाटील, शिवसेना नेते समन्वयक बबन पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे प्रितम म्हात्रे, पनवेल शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत, श्रीनाथ पाटील, आम आदमी पार्टीचे पनवेल विधानसभा अध्यक्ष शेखर जांभळे, पनवेल समाजवादी पार्टीचे अध्यक्ष नाईक साहेब, काँग्रेसचे पनवेल विधानसभा अध्यक्ष सुदाम पाटील, मावळ लोकसभा समन्वयक (शरदचंद्र पवार गट) सुवर्णा जोशी, भावणाताई घाणेकर, खालापूरचे माजी नगराध्यक्ष संतोष जंगम यांच्यासह सर्व तालुकाध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, सरपंच आदी उपस्थित होते.

देश हुकूमशाहीकडे वाटचाल करत असून भाजप सरकार संविधान संपवण्याचे काम करत असल्याचे सांगत सचिन अहिर यांनी आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे केले. ते पुढे म्हणाले की, शिवसेना सोडून गद्दारांना मावळ मतदारसंघात गाडून टाकणाऱ्यांना धडा शिकवण्याची हीच वेळ आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा आणि इंडिया आघाडीचा झेंडा फडकवण्यासाठी सज्ज व्हा. शिवसेना आणि बाळासाहेब ठाकरे यांचे जे होऊ शकले नाही. ते तुमचे आणि आमचे काय होणार, असा थेट सवाल गद्दारी करणा-यांना त्यांनी केला. तसेच इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघरे यांना भरघोस मतांनी निवडून देण्याचे काम आपल्याला करायचे आहे, असेही ते म्हणाले.पुणे आणि रायगड अशा दोन भागात विस्तारलेला हा मावळ लोकसभा मतदारसंघ अनेक अर्थाने महत्वाचा आहे. या मतदारसंघात वेगवेगळे प्रश्न आणि वेगवेगळ्या समस्या आहेत. सोबतच्या आपल्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना घेऊन या समस्या सोडवण्यासाठी, तसेच मावळ लोकसभा मतदारसंघाचा विकास घडवून आणण्यासाठी मी कटिबद्ध आहे, असे यावेळी संजोग वाघेरे पाटील यांनी म्हटले. आपल्या सर्वांना मिळून ही लढाई लढायची असून भविष्यातही चांगली वाटचाल करायची असल्याचे ते यावेळी उपस्थित इंडिया आघाडीतील पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी बोलताना म्हणाले.

# सावरकर चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही

## पिंपरीत आंबेडकरी पक्ष संघटना आक्रमक

**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
विनायक दामोदर सावरकर यांच्या जिवनावर आधारित अभिनेता रणदिप हुड्डा याच्या प्रमुख भूमिकेतील सावरकर हा चित्रपट येत्या २२ मार्च पासून प्रदर्शित केला जाणार आहे. दरम्यान चित्रपटावर आक्षेप घेत आज पिंपरी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक याठिकाणी तीव्र विरोध प्रदर्शन करण्यात आले. पिंपरी चिंचवड शहरातील एकाही सिनेमागृहात शो होऊ देणार नसून चित्रपट बंद पाडु असा इशारा शहरातील तमाम आंबेडकरी पक्ष संघटनांनी दिला आहे. सावरकर चित्रपटांतील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यक्तिरेखेत बदल व्हावा अथवा सीन कट करण्यात यावेत अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे. सावरकर या चित्रपटात महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अभिनयासाठी निवडलेल्या कलाकारावरून फक्त सोशल मीडियातुनच नव्हे तर देशभरातील लोकशाही तथा संविधान मानणार्या मोठ्या वर्गाकडून निषेध व्यक्त केला जात आहे. चित्रपटात बाबासाहेबांचा चेहरा त्यांच्या व्यक्तिमत्वाला साजेसा नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खरे फोटो उपलब्ध असून ते इंग्रजांच्याही राहणीमानाला लाजवेल असा त्यांचा पेहराव होता. चेहर्यावर प्रखर तेज होते. मात्र चित्रपटात ऐतिहासिक पात्र निवडताना काहीतरी साधर्म्य असायला हवे की नको? एकाला हिरो दाखवण्यासाठी महामानवाचे विकृतीकरण करण्याचा डाव सावरकर चित्रपटाचे दिग्दर्शक, निर्माता व त्यांच्या संपूर्ण टीम ने आखला आहे असे यातून जाहिर होत आहे. लोकसभा निवडणूकांच्या तोंडावर भाजप व आरएसएस सावरकरांना प्रोजेक्ट करत आहेत. चित्रपटात सावरकरांचे खरे जिवनचरित्र दाखवले की नाही माहिती नाही मात्र भाजपाचा प्रचार करणारा हा भाजपाचा प्रचारपट आहे असे मानले जात आहे. तात्काळ या चित्रपटावर बंदी घालण्यात यावी. बाबासाहेबांच्या भूमिकेतील केलेले संपुर्ण चित्रिकरण कट करुन दिग्दर्शक, निर्माता, अभिनेत्यासह संबंधित संपूर्ण टीम वर भावना दुखावल्या प्रकरणी गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात आली. यावेळी रिपाईचे सुरेश निकाळजे, लढा युथ मूव्हमेंटचे प्रमोद क्षिरसागर, एमआयएमचे शहराध्यक्ष धम्मराज साळवे, बहुजन सम्राट सेनेचे संतोष निसर्गंध, भीमशाही युवा संघटनेचे शिवशंकर उबाळे, बुद्धभूषण अहिरे, दीपक जगताप, धुराजी शिंदे, अरुण मैराळे, राजेश नागोसे, प्रमोद शिंदे, अमोल उबाळे, विनोद चांदमारे, माऊली बोराटे, अजीज शेख, रफिक शेख व इतर मान्यवर उपस्थित होते.

# कायद्यामुळे आमदार लंकेंचा पक्षप्रवेश टळला

## लंके यांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश?

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राष्ट्रवादी काँग्रेसचे पारनेरचे आमदार नीलेश लंके यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश होणार असल्याची चर्चा सुरू झाली असताना लंके आणि शरद पवार यांची गुरुवारी भेट झाली. मात्र थेट पक्षप्रवेश झाला नाही. पवार यांच्या विचारसरणी मला नेहमीच मान्य आहे, असे लंके यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले. त्यामुळे ते मनाने शरद पवार यांच्यासमवेत असल्याचेही स्पष्ट झाले. दरम्यान, लंके यांनी पक्ष प्रवेश केल्यास त्यांची आमदारकी धोक्यात येईल, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. त्यामुळे तांत्रिक अडचणींमुळे लंके यांचा पक्ष प्रवेश तूर्त टळला असल्याचे पुढे आले आहे.राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर अजित पवार



यांच्यासमवेत गेलेले आमदार नीलेश लंके राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. यापूर्वी शरद पवार यांनी ही अफवा असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी लंके यांच्या भेटीनंतर ते पक्ष प्रवेश करणार असल्याचे स्पष्ट संकेत दिले होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या उपस्थितीत लंके यांनी लिहिलेल्या 'मी अनुभवलेला कोविड' या पुस्तकाचे प्रकाशन पवार यांच्या हस्ते होणार असून ते जाहीर पक्ष प्रवेश करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. मात्र या तिघांनी गुरुवारी पक्ष कार्यालयात पत्रकार परिषद घेतली. मात्र प्रवेशाबाबत थेट बोलणे टाळले. त्यामुळे त्यांच्या पक्ष प्रवेशाबाबतचा संभ्रमही कायम राहिला.'तुमच्या हातात घड्याळ आहे की तुतारी ? असा थेट प्रश्न लंके यांना विचारण्यात आला असता 'साहेब सांगतील तो आदेश', असे सूचक उत्तर त्यांनी दिले. मात्र पक्ष प्रवेशाबाबत बोलणे टाळले. मी शरद पवार यांच्या विचारधारेबरोबर आहे. लहानपणापासूनच शरद पवार यांच्या नेतृत्वाचा आणि विचारांचा माझ्यावर पगडा आहे. करोना संकट काळातील अनुभवांवर लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन पवार यांच्या हस्ते व्हावे, अशी माझी इच्छा होती. त्यासाठी मी पुण्यात आलो आहे,' असे लंके यांनी स्पष्ट केले. विचारधारा आहे मग पक्षही एकच आहे का, असे विचारण्यात आले असता, विचारधारा आणि पक्ष एकच आहे. माझ्या कार्यालयातही पवार यांचे छायाचित्र आहे. मी कधीही शरद पवार यांच्याविरोधात टीकाटिप्पणी केलेली नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले. पारनेर तालुक्यातील कष्टाळू कार्यकर्ते म्हणून लंके सर्वांना परिचित आहेत. ते आमच्या पक्ष कार्यालयात आले. त्यासाठी मी त्यांचे स्वागत करतो. यापुढे त्यांना कोणतीही मदत लागली तर त्यांना निश्चित सहकार्य केले जाईल, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली. लंके यांच्या पक्ष प्रवेशाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही बारामती दौऱ्यात प्रतिक्रिया दिली. लंके यांनी चुकीची भूमिका घेऊ नये. त्यांची चुकीची भूमिका घेतल्यास त्यांची आमदारकी धोक्यात येईल. पक्षाच्या विरोधात भूमिका घेतली तर, पक्षांतर्गत बंदी कायद्यानुसार आमदारकी रद्द होते, अशी सूचक प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली. त्यामुळे तांत्रिक अडचणींमुळेच लंके यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातील प्रवेश तूर्त टळल्याचे दिसत आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे पारनेरचे आमदार नीलेश लंके यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश होणार असल्याची चर्चा सुरू झाली असताना लंके आणि शरद पवार यांची गुरुवारी भेट झाली. मात्र थेट पक्षप्रवेश झाला नाही. पवार यांच्या विचारसरणी मला नेहमीच मान्य आहे, असे लंके यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले. त्यामुळे ते मनाने शरद पवार यांच्यासमवेत असल्याचेही स्पष्ट झाले. दरम्यान, लंके यांनी पक्ष प्रवेश केल्यास त्यांची आमदारकी धोक्यात येईल, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे.

# निलेश लंकेला मीच पक्षात आणलं : अजित पवार

## आम्ही सुरुवातीपासूनच पवारांच्या विचारांचे आहोत : लंके

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** अजित पवार गटाचे आमदार निलेश लंके यांनी आज (दि.१४) राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षात प्रवेश केला. आम्ही सुरुवातीपासूनच पवारांच्या विचारांचे आहोत, असं निलेश लंके यांनी स्पष्ट केलं. दरम्यान, आता अजित पवारांनी निलेश लंकेंच्या प्रवेशाबाबत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

''वास्तविक निलेशला पक्षात मी घेतल. निलेशला मनापासून आधार दिला. विकास कामांसाठी मी त्याला प्रचंड निधी दिला होता'', असं अजित पवार म्हणाले. ते बारामती येथे बोलत होते.अजित पवार म्हणाले, निलेश लंके (छळश्रीह डरपज्ञश) जाऊ शकत नाही. त्याला जायचं असेल तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा द्यावा लागेल. त्याच्यामुळे राजीनामा देऊन कोणालाही कोठेही जाता येतं. वास्तविक निलेशला पक्षात मी घेतल. निलेशला मनापासून आधार दिला. विकास कामांसाठी मी त्याला प्रचंड निधी दिला होता. कालच माझ्याकडे तो आला होता. काही गोष्टी त्याला



मी नीट समजून सांगितल्या. मात्र, काही लोकांनी त्याच्या डोक्यात हवा घातलेली आहे की, तू खासदार होशील. मात्र, अस काहीही नाही.

निपुढे बोलताना लंके म्हणाले, मी शरद पवारांची भेट घ्यायला आलो ते खासदारकीची आशा आहे म्हणून नाही. मी काल देखील साहेबांच्या विचारांचा होतो आणि आजही त्यांच्याच विचारांचा आहे. इथे येण्यापूर्वी मी लोकसभेसाठी कोणतीही चर्चा केलेले नव्हती.

मी शरद पवार साहेबांच्या आशीर्वादाने अद्ययावत सुविधा असलेली रुग्णवाहिका सुरु करणार आहे. आज माझ्यासोबत अहमदनगर आणि पारनेरमधील अनेक सहकारी उपस्थित आहेत, त्यांचेही मी आभार मानतो, असंही लंके यावेळी म्हणाले होते. लेश लंके (छळश्रीह डरपज्ञश) म्हणाले, कोरोना काळात पती त्याच्या पत्नीला विसरला.

भाऊ भावाला विचारत नव्हता. त्या काळात मी पवार साहेबांच्या नावाने आरोग्य मंदिर सुरु केले. आरोग्य मंदिराच्या माध्यमातून ३१ हजार लोकांवर उपचार करता आले. पवार साहेबांची अदृश्य ताकद माझ्यासोबत होती. या घटना मी आयुष्यात कधीही विसरु शकणार नाही. मी साहेबांना कधीही सोडून गेलेलो नव्हतोच, असंही लंके यांनी स्पष्ट केलं.

''वास्तविक निलेशला पक्षात मी घेतल. निलेशला मनापासून आधार दिला. विकास कामांसाठी मी त्याला प्रचंड निधी दिला होता'', असं अजित पवार म्हणाले. ते बारामती येथे बोलत होते.अजित पवार म्हणाले, निलेश लंके (छळश्रीह डरपज्ञश) जाऊ शकत नाही. त्याला जायचं असेल तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा द्यावा लागेल. त्याच्यामुळे राजीनामा देऊन कोणालाही कोठेही जाता येतं.

# ऊसाला ५ हजार दर मिळण्यासाठी याचिका

## उस दरवाढीसाठी देशातील पहिलीच याचिका



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** वाढीव उत्पादन खर्चाचा समावेश करून तसेच बाजारातील महागाई निर्देशांक विचारात घेऊन शेतमालाचे दर ठरवावेत. साखरेचे दर द्विस्तरीय करावेत, तसेच ऊसाचा दर (एफ.आर.पी.) ठरवत असताना मूळ रिकव्हरी बेस १०.२५ ऐवजी ८.५ टक्के धरून ठरवावा. यामुळे उसाला ५ हजार प्रतिटन दर मिळू शकतो, यासाठी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली असल्याची माहिती जय शिवराय किसान संघटनेचे अध्यक्ष शिवाजी माने यांनी दिली. जय शिवराय किसान संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केळवडे (ता. भोर) येथे बुधवारी (दि. १३) पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष श्यामसुंदर जायगुडे, कोषाध्यक्ष सदाशिव कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष दत्ता गोते, उत्तम पाटील, शीतल कांबळे, उदय पाटील, बाजीराव पाटील, सागर माळी, राजेंद्र धुमाळ, बाळू जाधव आदी उपस्थित होते. याबाबत माहिती देताना माने म्हणाले, सी.ए.सी.पी.ने केलेल्या शिफारशीनुसार उसाचा दर (एफ.आर. पी.) ठरवत असताना मूळ रिकव्हरी बेस ८.५ टक्के होता. तो सध्या वाढवून १०.२५ टक्के केला. यामुळे शेतकऱ्यांचे प्रतिटन दीड हजाराचे नुकसान झाले आहे. एफआरपी वाढल्यानंतर देखील तोडणी वाहतूक एफआरपीमधून वजा करूनच शेतकऱ्यांना ऊसाची बिले दिली जातात. वास्तविक घरगुती वापरासाठी लागणारी साखर जीवनावश्यक वस्तूंमध्ये धरली पाहिजे. साखर केवळ २० टक्के घरगुती वापरासाठी लागते. उर्वरित ८० टक्के साखर औद्योगिक कारणांसाठी लागते. यातून साखर सम्राट प्रचंड नफा कमवतात. यासाठी साखरेचे दर द्विस्तरीय करावेत, अशी मागणी याचिकेत केली आहे.माने म्हणाले, गेल्या पाच वर्षांमध्ये उसाचा उत्पादन खर्च ७० टक्के वाढला आहे. सरकारने शेतकऱ्यांना करमुक्त ठेवले नसून प्रत्यक्षात ऊसापासून बनवणाऱ्या उपपदार्थातून सरकारला प्रतिटन ३५०० ते ३ हजार रुपये कर मिळतो. रासायनिक खतांसह शेती औजारांवर शेतकरी सरकारला साडेचार हजार रुपये कर भरत आहे. मात्र, उसाला केवळ ३ हजार प्रतिटन दर मिळत आहे. सरकारच शेतमालाचे दर ठरवत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या कर्जाची जबाबदारी सरकारने घ्यावी, सर्व कर कमी करून सरकारने ऊसाला प्रति टन ५ हजार रुपये भाव दिला पाहिजे, अशी प्रमुख मागणी याचिकेत केली आहे. सर्व शेतमाल नियंत्रण मुक्त करावा, सरकारने लेबर सिक्युरिटी ॲक्टप्रमाणे फार्मर सिक्युरिटी ॲक्ट करावा, दोन कारखान्यांमधील अंतराची अट काढून टाकावी, अमेरिकेतील कायद्यांप्रमाणे एम.एल. पी.पी. आणि एल.एल. पी.पी. शेतकऱ्यांना लागू करावी, असे याचिकेत म्हटले आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेमुळे सध्याच्या वाढीव उत्पादन खर्चानुसार ऊस दर ५ हजार रुपये मिळणे शक्य होईल, असा विश्वास शामसुंदर जायगुडे यांनी व्यक्त केला.हळद किंवा कापूस देखील ८ ते १० क्विंटल विकल्यानंतर एक तोळा सोने मिळत आहे. शेतकऱ्यांना मात्र २० ते २२ टन ऊस विकल्यानंतर एक तोळा सोने येते. शेतकऱ्यांच्या बाबतीतच विषमताजनक धोरण कशासाठी? बाजरात असणाऱ्या इतर घटकांशी समतोल पद्धतीने शेतमालाचे दर वाढवले पाहिजेत, असेही याचिकेत म्हटले आहे.

### समतोल धोरण राबवा

» एफआरपी वाढल्यानंतर देखील तोडणी वाहतूक एफआरपीमधून वजा करूनच शेतकऱ्यांना ऊसाची बिले दिली जातात. वास्तविक घरगुती वापरासाठी लागणारी साखर जीवनावश्यक वस्तूंमध्ये धरली पाहिजे. साखर केवळ २० टक्के घरगुती वापरासाठी लागते. उर्वरित ८० टक्के साखर औद्योगिक कारणांसाठी लागते. यातून साखर सम्राट प्रचंड नफा कमवतात. यासाठी साखरेचे दर द्विस्तरीय करावेत, अशी मागणी याचिकेत केली आहे.माने म्हणाले, गेल्या पाच वर्षांमध्ये उसाचा उत्पादन खर्च ७० टक्के वाढला आहे. सरकारने शेतकऱ्यांना करमुक्त ठेवले नसून प्रत्यक्षात ऊसापासून बनवणाऱ्या उपपदार्थातून सरकारला प्रतिटन ३५०० ते ३ हजार रुपये कर मिळतो. रासायनिक खतांसह शेती औजारांवर शेतकरी सरकारला साडेचार हजार रुपये कर भरत आहे.

# 'पुणे इसिस' प्रकरणात चारजणांविरुद्ध पुरवणी आरोपपत्र

## आत्तापर्यंत ११ संशयितांविरुद्ध आरोपपत्र दाखल

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महाराष्ट्र, गुजरातसह पुणे शहरात स्फोट घडवून आणण्याच्या कटात सहभागी असलेल्या 'पुणे इसिस' प्रकरणातील आणखी चार आरोपींविरुद्ध राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून (एनआयए) न्यायालयात पुरवणी आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या चार आरोपींसह आत्तापर्यंत ११ संशयितांविरुद्ध आरोपपत्र दाखल केल्याची माहिती 'एनआयए'कडून गुरुवारी देण्यात आली. महम्मद शाहनवाझ आलम, रिझवान अली, अब्दुल्ला शेख, तल्हा लियाकत खान अशी चार आरोपींची नावे आहेत. 'एनआयए'ने यापूर्वी दाखल केलेल्या आरोपपत्रात सात आरोपींपैकी शामिल नाचन याच्यावर अतिरिक्त आरोप दाखल केले आहेत. पुण्यातील कोथरूड परिसरात जुलै २०२३ मध्ये दुचाकी चोरीच्या संशयावरून पोलिसांनी चारजणांना ताब्यात घेतले होते. कोंढव्यात घरझडतीसाठी जात असताना त्यापैकी महम्मद शाहनवाझ आलम पोलिसांच्या ताब्यातून पसार झाला होता. त्याला 'एनआयए'ने मागील दोन नोव्हेंबर रोजी अटक केली होती. तपास यंत्रणेने महम्मद आलमच्या कपड्यांमधून 'डीएनए'चे नमुने घेतले होते. त्या नमुन्यावरून त्याची ओळख पटली होती. सर्व आरोपी इसिस दहशतवादी संघटनेचे सदस्य आहेत. आरोपींनी महाराष्ट्र आणि गुजरात राज्यातील प्रमुख शहरांमध्ये दहशतवादी हल्ले करण्यासाठी महत्त्वाच्या ठिकाणांची रेकी केली होती. महाराष्ट्र, गुजरात आणि पुणे शहर परिसरात स्फोट घडवून आणण्याच्या कटात त्यांचा सहभाग होता, असे 'एनआयए'च्या तपासात समोर आले आहे. आरोपी गोपनीय संवाद ॲप्सद्वारे परदेशातील हँडलरच्या संपर्कात होते. ते दरोडे आणि चोरी करून दहशतवादी कारवायांसाठी निधी गोळा करत होते. तसेच, त्यांना हँडलर्सकडून निधी मिळत होता. आरोपींनी पुण्यातील कोंढवा भागात स्फोटके तयार करण्याचे प्रशिक्षण घेतले. त्यांनी पश्चिम घाटातील जंगलात गोळीबाराचा सराव आणि नियंत्रित स्फोटही घडवून आणल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.